
ऑक्टोबर-२०२४ * अंक-४ था

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**



ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB OF OJAI 75th Anniversary 1948 - 2023




BACHPAN
CLUB THEME 2024-25

## संपादकीय....✍

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वांना विजया दशमीच्या हार्दिक शुभेच्छा!

आपला क्लब अमृत महोत्सवी वर्ष साजर करत आहे .त्या दृष्टीने बचपन का मेला, मेडिकल कॅम्प, पब्लिक स्पीच असे भरगच्च कार्यक्रम यशस्वीपणे पार पडत आहेत .क्लबचा उत्साह जणू ओसंडून वाहत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नुकतेच रो.उदय भाऊंच्या कमिटीच्या प्रयत्नांनी आपल्या क्लबने डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स साठी ७५ या ऐतिहासिक संख्येने नाव नोंदणी केलेली आहे. त्याबद्दल डिस्ट्रिक्ट गव्हर्नर खुराना सरांनी सर्वांचे अभिनंदन केलेले आहे.

ऑक्टोबर महिना हा 'कम्युनिटी इकॉनॉमिक अँड डेव्हलपमेंट डेसिग्नेटेड मंथ' आहे. त्या अनुषंगाने लेख पान नंबर चार वर दिलेला आहे. त्यानुसार प्रोजेक्ट आणि साप्ताहिक सभा आपण घेणारच आहोत. तसेच ऑक्टोबर महिन्यात आपण नवरात्रीसह दिवाळी ही साजरी करणार आहोत. म्हणजेच स्त्री शक्तीचा उत्सव साजरा करणार आहोत. चातुर्य ,बुद्धी, सुंदर मन आणि दयाळू हृदय या अमूल्य गोष्टी संपूर्ण सृष्टीत फक्त दोनच व्यक्तींकडे पाहायला मिळतात .एक म्हणजे जग चालवणारा परमेश्वर आणि दुसरे म्हणजे हे जग सांभाळणारी स्त्री. पण आजूबाजूस तिच्यावर होणारा अत्याचार नजरेस पडतो आहे. हा महिना स्त्री शक्तीच्या जागराचा आणि दुर्गा मातेच्या पूजेचा आहे. आज स्त्रीला दुर्गा म्हणून स्वतःचे संरक्षण करायची गरज आहे. स्त्री स्वतः सक्षम आहे, सर्व संकटांना तोंड द्यायला .एक स्त्री घरातील चालती बोलती लक्ष्मी असते, सरस्वती होऊन मुलांचा अभ्यास घेते, दुर्गा होऊन संकटांची सामना करते, काली– चंडिका होऊन घराचे रक्षण करते, पण तिला पूजा नको स्त्री म्हणून सन्मान हवा!

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम, मित्रांनो,

ऑक्टोबर महिना हा रोटरी चा 'कम्युनिटी इकॉनॉमिक अँड डेव्हलपमेंट डेसिग्नेटेड मंथ' आहे. नेहमी प्रमाणे, या महिन्यात ही आपली सुरूवात ''अजिंठा बुलेटीन' प्रकाशित करण्याने झाली. खरच रो.स्वाती ढाके मॅडमचे जितके कौतुक केले ते कमीच होणार. या महिन्यात विविध प्रकल्पातून आपल्या क्लबच्या सदस्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. त्याचा उल्लेख करण्यासारखे प्रकल्प म्हणजे रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्ट यांनी आयोजित केलेले सायक्लोथॉन ॲन्ड वॉकॅथॉन मध्ये सर्वात जास्त सहभाग म्हणून आपल्या क्लबचा गौरव करण्यात आला. त्याबद्दल सगळ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. या महिन्यात आपल्या बऱ्याच सदस्यांनी रोटरीचे ऑनलाईन कोर्स पूर्ण केले. रो.शुभदा कुलकर्णी, रो.स्वाती ढाके, रो.डॉ.काजल फिरके यांचे ही अभिनंदन व ऑनलाईन कोर्स पूर्ण करण्यासाठी आपले भावी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांचा मोलाचा सल्ला कामात आला. तसेच रो.गिरीश कुलकर्णी यांनी ई–लर्निंग बाबत सगळी माहिती दिली. आपल्या क्लब तर्फे सावदा या गावी भव्य मेडीकल कॅम्प ही आयोजित करण्यात आला. त्यासाठी माजी अध्यक्ष डॉ.जयंत जहागीरदार, रो.रितेश जैन, रो.राकेश चव्हाण यांचे अभिनंदन. गणपतीच्या विसर्जनाच्या दिवशी आपल्या क्लब मध्ये निर्माल्य संकलनाचा प्रोजेक्ट घेण्यात आला. त्याबाबत रो.शमा सराफ, सुभाष अमळनेरकर यांचे सहकार्य लाभले. तसेच आपल्या वार्षिक थिम 'बचपन' अंतर्गत आपण ''बचपन का मेला'' हे यशस्वी रित्या कार्यक्रम आयोजित केले. यापुढेही आपल्या सगळ्यांचे असेच सहकार्य मिळेल, या बाबत माझ्या मनात कुठेही शंका नाही.

**– रो. ॲड. सागर चित्रे**

# सप्टेंबर महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ ६ सप्टेंबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही बिझनेस मिटींग होती. यावेळी फिजीओथेरपी क्लीनिक, थॅलेसेमिया प्रोजेक्ट, सायन्स् व्हॅन प्रोजेक्ट, रोटरॅक्ट क्लब इस्टॉलेशन अशा विविध प्रोजेक्टस् बाबत चर्चा करण्यात आली.

**✻ १३ सप्टेंबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता 'रोटरी सर्टिफिकेटस्– ई–लर्निंग' वक्ते होते रो.गिरीश कुलकर्णी. या वेळी त्यांनी उपस्थित सर्व रोटेरियन्स्ला रोटरी सर्टिफिकेटस् – ई–लर्निंग बद्दल सविस्तर आणि प्रात्यक्षिक माहिती दिली. हे सर्व कोर्स करून रोटरी बद्दल अधिकाधिक माहिती प्राप्त करण्यासाठी सर्वांना प्रोत्साहीत केले.







**✻ २० सप्टेंबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही २२ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. ''बचपन का मेला'' शिर्षका अंतर्गत विविध खेळ व मनोरंजनाचे कार्यक्रम यावेळी रोटरी क्लबच्या हॉलवर आयोजित करण्यात आले होते.

**✻ २७ सप्टेंबर** – रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता– 'पर्यटन आज आणि उद्या.' जागतिक पर्यावरण दिना निमित्त हा विषय निवडला होता. वक्ते होते. श्री.कपिल पाठक वक्त्याचा परिचय रो.विजय जोशी यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन रो.केदार मुंदडा यांनी केले.



# सप्टेंबर महिन्यातील प्रोजेक्टस्




✲ **१७ सप्टेंबर** – रोजी निर्माल्या संकलन कार्यक्रम रोटरी क्लब जळगाव तर्फे आयोजित करण्यात आला होता. यावेळी अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे, मा.सचिव रो.पराग अग्रवाल तसेच २७ रोटेरियन्स् आणि १२ रोटरॅक्टर्स यांनी उत्साहाने सहभाग घेतला.




✲ **१५ सप्टेंबर** – रोजी सावदे रिंगणगाव येथे मेडीकल कॅम्प घेण्यात आला. यावेळी २६७ रूग्णांना तपासण्यात आले.




✲ **२१ सप्टेंबर** – रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे १३ रूग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया विष्णुलीला डोळ्यांचे हॉस्पीटल येथे करण्यात आले. रो.डॉ.तुषार फिरके व डॉ.काजल फिरके यांनी सर्व ऑपरेशन केले. याप्रसंगी रोटरी सभासद उपस्थित होते.

**७X७X७ प्रोजेक्ट**–अंतर्गत रो.गिरीश कुलकर्णी रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.स्वाती ढाके, रो.पंकज व्यवहारे, रो.डॉ.प्रज्ञा जंगले, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.सुबोध सराफ, रो.कॅप्टन कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले.






# 'कम्युनिटी इकॉनॉमिक अँड डेव्हलपमेंट

रोटरी समुदाय सेवेला त्याच्या हृदयाचे ठोके मानते. १९०७ मध्ये शिकागो सिटी हॉलमध्ये आराम स्टेशनचे बांधकाम रोटरीच्या इतिहासातील एक टर्निंग पॉइंट होता. या पहिल्या कम्युनिटी सर्व्हिस प्रोजेक्टने रोटरीला जीवदान दिले आणि त्यातून या कार्याला सुरुवात झाली.रोटरी कम्युनिटी सर्व्हिस प्रत्येक रोटेरियनच्या वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामुदायिक जीवनासाठी सेवेचा आदर्श वापरण्यास प्रोत्साहित करते आणि प्रोत्साहन देते, जसे की रोटरीच्या ऑब्जेक्टच्या तिसऱ्या भागात कल्पना केली आहे. सामुदायिक सेवेमध्ये लक्षात ठेवण्याचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, रोटेरियन्सद्वारे प्रदान केलेल्या सेवा, किरकोळ किंवा मोठ्या समाजाच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. सेवा ही सेवेसाठी नसावी ज्यामुळे लोकांकडून टीका होऊ शकते. एका समाजाची गरज दुसऱ्या समाजासाठी सारखी नसावी.रोटरीने इतरांद्वारे चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही सेवा क्रियाकलापांची नक्कल करण्याचा विचार करू नये. चेंबर ऑफ कॉमर्स किंवा इतर काही संस्था सेवा उपक्रम करू शकत असल्यास रोटरी त्यांना मदतीचा हात देऊ शकते. तसेच स्थानिक सरकार किंवा संपूर्ण समुदाय एकत्रितपणे हाती घेऊ शकणारे मोठे प्रकल्प रोटरीने हाताळण्याची गरज नाही. कोणताही सेवा उपक्रम सुरू करण्यापूर्वी समाजाच्या गरजा ओळखण्यासाठी सर्वेक्षण करणे अत्यावश्यक आहे. रोटरीने १९२३ मध्ये स्वीकारलेले आणि वेळोवेळी दुरुस्त केलेले धोरणात्मक विधान समुदाय सेवा पार पाडण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे देते. आर.ए. शिफारस करतो की प्रत्येक क्लब दरवर्षी एक मोठा समुदाय सेवा प्रकल्प हाती घेईल आणि त्याच वर्षी प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल. याचा अर्थ असा नाही की प्रकल्प अपूर्ण राहिल्यास रोटरीची प्रतिमा मलिन करून अर्धवट सोडले पाहिजे. प्रसिद्धी हे समाजसेवेचे उद्दिष्ट नसले तरी, समाजाने रोटरीचे खऱ्या अर्थाने मूल्यमापन करण्यासाठी रोटरीच्या उपक्रमांना पुरेशी प्रसिद्धी दिली जाऊ शकते. योग्य जनसंपर्क प्रयत्नांमुळे रोटरीच्या प्रयत्नांना समाजाकडून चांगले सहकार्य मिळेल. वर्षानुवर्षे रोटरी कम्युनिटी सर्व्हिस अव्हेन्यूमध्ये नवीन आयाम जोडत आहे. संस्थापक पॉल हॅरिस यांनी सुचविल्याप्रमाणे, हे बदलते जग असल्याने रोटरीला बदलावे लागेल. समाज सेवा उपक्रम देखील आजच्या गरजेनुसार बदलले पाहिजेत. १९९२ च्या काउन्सिल ऑन लेजिस्लेशनने स्वीकारलेल्या कम्युनिटी सर्व्हिसवरील विधानात स्पष्टपणे नमूद केले आहे की 'समुदाय सेवा ही प्रत्येक रोटेरियनसाठी 'स्वतःच्या वरील सेवा' चे उदाहरण देण्याची संधी आहे. समाजात राहणाऱ्यांचे जीवनमान सुधारणे आणि सार्वजनिक हिताची सेवा करणे ही प्रत्येक रोटेरियन आणि रोटरी क्लबची बांधिलकी आणि सामाजिक जबाबदारी आहे. या भावनेने, क्लबना प्रोत्साहित केले जाते: त्यांच्या समुदायातील सेवा संधींचे नियमितपणे पुनरावलोकन करा आणि प्रत्येक क्लब सदस्याला समुदायाच्या गरजांच्या मूल्यांकनात सामील करा:त्यांच्या समुदाय सेवा प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सदस्यांच्या अद्वितीय व्यावसायिक आणि व्यावसायिक कौशल्यांचा फायदा घ्या; समाजाच्या गरजांनुसार प्रकल्प सुरू करा आणि क्लबची समाजातील स्थिती आणि क्षमता यांच्याशी सुसंगतपणे, प्रत्येक समुदाय सेवा क्रियाकलाप कितीही लहान असला तरीही महत्त्वाचा आहे हे ओळखून;आणि इतर गटांसह जवळून काम करा, जे ते प्रायोजित करतात, समुदाय सेवा प्रयत्नांमध्ये समन्वय साधण्यासाठी, रोटरी कार्यक्रम आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपक्रमांद्वारे समुदाय सेवा प्रकल्प वाढवण्याच्या संधी ओळखा, आवश्यक संसाधनांच्या तरतुदीसह, समुदाय सेवा प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये, जेव्हा इष्ट आणि व्यवहार्य असेल तेव्हा समुदायाचा समावेश करा; सामुदायिक सेवा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आर.आय. धोरणानुसार इतर संस्थांना सहकार्य करणे, त्यांच्या समुदाय सेवा प्रकल्पांसाठी योग्य सार्वजनिक मान्यता प्राप्त करणे; इतर संस्थांना समुदाय सेवेच्या प्रयत्नांमध्ये एकत्र काम करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी उत्प्रेरक म्हणून काम करा. आर.आय. क्लबच्या सामुदायिक सेवा उपक्रमांची जबाबदारी स्वीकारण्यासाठी, समुदाय सेवेच्या विशिष्ट पैलूंसाठी नेमलेल्या समित्यांच्या कामाचे पर्यवेक्षण आणि समन्वय साधण्यासाठी आणि समुदाय सेवेशी संबंधित विशेष महिन्यांचा प्रचार करण्यासाठी विशिष्टक्लब स्तरावरील समित्या स्थापन करण्याची शिफारस करते.

# रोटरी सा रे ग मा

विशाखा पोतदार



रोटरी एक मंच असा आहे जेथे विविध क्षेत्रातील, विविध आवडीचे, विचारांचे लोक एकत्र येत असतात. त्यामुळे आपसुकच आपल्या आवडीला–छंदाला प्रोत्साहन मिळत असते. प्रत्येकाकडे काहीतरी कला गुण असतोच, त्यालाही वाव मिळतो. अशीच आवड आणि छंद जोपसण्याच्या कल्पनेतून २०२१ मध्ये आमच्या ‘रोटरी सा रे गा मा’ ची सुरूवात झाली.

संगीताची ज्यांना आवड आहे. अशी १०–१५ जण एकत्र आले. या कामी कॅप्टन मोहन कुलकर्णी , शुभदा मॅडम, सुबोधभाऊ सराफ, सौ.स्मिता पाटील यांनी पुढाकार घेऊन आमच्या ग्रुपची सुरूवात केली. सुरूवातीला आमची सारेगमाची मैफील प्रत्येक महिन्याचा शेवटच्या रविवारी एखाद्या सदस्याचा घरी होत असे. गीतगायन, बासुरी वादन, गिटारवादन असे विविध प्रकार आमच्या मैफिलीत होत असतात. आवड आणि छंद यातून तयार झालेला, आमचा ग्रुप हळूहळू सामाजिक बांधिलकीतून वृद्धाश्रम, उडान सारखी स्पेशल चाईल्ड साठी काम करणाऱ्या संस्थेशी सुद्धा जोडलो गेलो. रोटरी मध्ये आमचे कार्यक्रम होतच असतात. पण अशा सामाजिक कार्यक्रमातून आम्हाला एक वेगळा आनंदही मिळू लागला. वृद्धाश्रमात आणि उडान येथे कार्यक्रम सादर करतांना तेथील सदस्यांचा सक्रीय सहभाग आणि त्याचे प्रेम तसेच चेहऱ्यावरील आनंद आमच्यासाठी खूपच प्रेरणादायी होता. तो आनंद आणि समाधान शब्दात सांगू शकत नाही.

आज आमच्या ग्रुपला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यात नवीन सदस्य जुळत गेले. काही सदस्य असेही आहेत की त्यांची प्रतिभा सारेगमा ग्रुप मुळे बाहेर आली. रोटरी इंटरनॅशनल चे आयएफआरएम या संस्थेशी आमच्या ग्रुपचे काही सदस्य जोडले गेलेले आहेत. प्रत्येक मैफिली गणिक कलाकारांची संख्या आणि गुणवत्ता वाढत आहे. त्यामुळे आमची प्रत्येक मैफील ही दर्जेदार आणि उत्तम होत असते. म्हणून प्रत्येक सदस्य मैफिलीची आतुरतेने वाट पहात असतो. त स ा असा हा आमचा रोटरी सारेगामा ग्रुप कायम वृद्धिंगत होत राहो आणि आमच्या कडून समाजाची सेवा सदोदित घडत राहो ही प्रभू चरणी प्रार्थना.








# इतिहासातील सुवर्ण पान

माजी अध्यक्ष रो.छबीलभाईशाह



१९८२-८३ मध्ये रो. छबिल भाई शहा हे आपल्या क्लबचे अध्यक्ष होते .त्यांना संपूर्ण डिस्ट्रिक्ट प्रेमाने **काकाजी** म्हणून संबोधतो. १९७४ साली काकाजी आपल्या क्लब चे सदस्य झाले .आज ते आपल्या क्लब मधील सर्वात ज्येष्ठ सदस्य आहेत. रोटरीच्या माध्यमातून दरवर्षी क्लबच्या बऱ्याच प्रोजेक्टसाठी काकाजी सर्वतोपरी मदत करीत असतात. ते जळगाव नगरपालिकेचे बरेच वर्ष बांधकाम सभापती होते .सार्वजनिक काम करत असताना सुद्धा काकाजींनी रोटरीचेही खूप काम केले. त्याचप्रमाणे रोटरी हॉलची निर्मिती त्यांच्या देखरेखी खालीच झाली .त्यांच्या प्रयत्नांनी, पुढाकाराने व सर्वांच्या मदतीने आपला रोटरी हॉल बांधला गेला .त्यांचे संपूर्ण कुटुंब हे पी.एच.एफ. आहे .ते स्वतः मेजर डोनर लेवल फोर आहेत .रोटरी फाउंडेशन मध्ये काकाजींचे जमा असलेल्या पॉईंट्स मध्ये क्लब मधील अनेक सदस्यांना पॉईट मॅच करून पी.एच.एफ. केलेले आहे . रोटरी इंटरनॅशनल ने त्यांना **सर्विस अबाउ सेल्फ** या पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. तसेच जळगाव मधील सर्व रोटरी क्लब तर्फे काकाजींना सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला होता .त्यांच्या रोटरीतील भरीव कामगिरीबद्दल आपल्या रोटरी क्लब तर्फे नुकताच गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांची पुस्तक तुला करून , सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात त्यांनी अनेक नवीन उपक्रम राबविले त्यातील काही प्रमुख उपक्रम:-

आज सर्व दूर नावारूपास आलेली झुणका भाकर योजना प्रथमतः त्यांच्या कालावधीतच सुरू झाली. रोटेरियंस कडून दिवाळीचा फराळ ,मिठाया तसेच शामा फायर वर्क्स मधून फटाके घेऊन सिव्हिल हॉस्पिटलच्या आजूबाजूच्या झोपडपट्टीमध्ये ते देऊन दिवाळीच्या आनंदात त्यांनाही सामील करून घेण्यात आले. रोटेरियन बंधूंच्या मनात गरिबांबद्दल असलेली कणव दर्शविणारे हे ऐक अत्यंत भावपूर्ण उदाहरण आहे .या योजनेचे सामाजिक महत्त्व ओळखून अनेक क्लब ही योजना आजही राबवीत आहे.

इ एन टी कॅम्प सिविल हॉस्पिटल येथे घेण्यात आला. तेव्हा डॉ. चिकोडी हे सिविल सर्जन होते. तसेच डॉ. तपन व त्यांची टीम घेऊन पुण्याहून आलेले होते . रात्री थंडीमध्ये १२ ते २ या वेळात शहरातले भिकारी स्टेशनवर मंदिराच्या आडोशाला अथवा चक्क फूटपाथवर नाईलाजाने झोपत असतात .थंडीपासून त्यांचे रक्षण व्हावे म्हणून अशा रस्त्यावर झोपलेल्या लोकांना ब्लँकेट डिस्ट्रीब्यूशन चे काम स्वतः रोटेरियन बंधू ठिकठिकाणी फिरून करीत .

लॅप्रोस्कोपी चा कॅम्प ही त्यांच्या कार्यकाळात झाला. सेकंडरी स्कूल टीचर साठी मेडिकल कॅम्प घेऊन त्यांच्यासाठी हेल्थ कार्ड तयार केले. जी.एस.टीमला पाहुणचार करून अजिंठा-एरोला ची ट्रिप केली . त्यांनी या वर्षी केलेल्या भरीव कामाची यादी लांबलचक आहे . जागे अभावी काही ठळक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. आपल्या क्लब मधील काही सीनियर मंडळी म्हणतात की, काकाजींचा रक्तगट हा **आर** (रोटरी )पॉझिटिव्ह असावा त्यामुळे रोटरी त्यांच्या रक्तारक्तात भिनलेली आहे. खरा रोटेरियन कसा असावा, याचे ते मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांचा केवळ आम्हालाच नव्हे, तर साऱ्या रोटरी विश्वाला अभिमान आहे .

# सप्टेंबर महिन्यातील काही छायाचित्रे






























# जीवेत् शरदः शतम्...!

| | | |
|---|---|---|
| १) | १ ऑक्टोबर | रो. केशरलाल भदादे |
| २) | १ ऑक्टोबर | रो. अरविंद हासवाणी |
| ३) | ४ ऑक्टोबर | पी.पी.रो. जगदीश जाखेटे |
| ४) | ९ ऑक्टोबर | रो. योगेश चौधरी |
| ५) | १५ ऑक्टोबर | रो. हेमंत बाविस्कर |
| ६) | १६ ऑक्टोबर | रो. दिलीप जैन |
| ७) | १७ ऑक्टोबर | रो. विजय जोशी |
| ८) | १९ ऑक्टोबर | पी.पी.रो. जितेंद्र ढाके |
| ९) | २४ ऑक्टोबर | रो. दिपक चांदोरकर |
| १०) | २४ ऑक्टोबर | पी.पी.रो. प्रेम कोगटा |

## ऑक्टोबर महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी ऑक्टोबर महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.


रो.योगेश गांधी


रो.आसिफ मेमन

# अभिनंदन !

* रो.डॉ.दिपक पाटील यांचा आय.एम.ए. जळगाव तर्फे मा.कलेक्टर श्री.आयुष प्रसाद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

* निमा संस्थेच्या नूतन कार्यकारिणीत डॉ.माधुरी कासट यांची अध्यक्ष म्हणून तर उपसचिव पदी रो.डॉ.पराग जहागीरदार आणि सदस्य म्हणून डॉ.सतिश शिंदाडकर, रो.डॉ.जयंत जहागिरदार, रो.डॉ.योगेंद्र कासट यांची निवड झाली आहे.

* आयएसएम ऑपथोमलॉजी १९ ऑल इंडिया कॉन्फरन्स मध्ये चेअरमन म्हणून डॉ.तुषार फिरके, रिसर्च पेपर्स चेअरमन डॉ.काजल फिरके, प्रमुख वक्ते म्हणून डॉ.हेमंत बाविस्कर हे होते. या कॉन्फरन्स मध्ये डॉ.तुषार फिरके व डॉ.काजल फिरके यांना सन्मानित करण्यात आले.

* रो.मुकेश महाजन यांच्या पत्नी सौ.तनुजा महाजन यांची स्व: भाऊसाहेब हिरे एस.एस.ट्रस्ट इन्स्टिट्युट ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, बांद्रा येथे डायरेक्टर म्हणून नियुक्ती झाली.

* रो.जितेंद्र ढाके यांचे सुपुत्र वृषांक ढाके याने इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या कॉलेज मधून एम.टेक. (केमिकल) ही डिग्री प्राप्त केली.

* रो.रमेश लाहोटी यांच्या पत्नी सौ.ज्योत्स्ना लाहोटी यांना जळगाव जिल्हा माहेश्वरी महिला मंडळा तर्फे नारी रत्न पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले.

* बलरंग भूमी परिषदे तर्फे रो.शमा सराफ यांचा सन्मान करण्यात आला.

* रो.सुबोध सराफ यांनी गणपती मंडळाचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

## * श्रद्धांजली *

रो.पारस कुचेरिया यांचे वडील श्री.सुरेंद्रजी बुधमलजी कुचेरिया यांने आकस्मिक निधन झाले.